


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217
वर्ष ३ रे अंक : ४१५ बुधवार दि १५ जुलै २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# भाजपश्रेष्ठींचा विरोध मावळावा, जयंत पाटलांचे फडणवीसांना साकडे? वर्षावर तासभराच्या बैठकीने चर्चांना उधाण

**जनसंचलन बुलढाणा** : राष्ट्रवादी काँग्रेस - शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांनी मंगळवारी रात्री मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा या शासकीय निवासस्थानी भेट घेतली. विशेष म्हणजे त्यांच्यासोबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे हेदेखील उपस्थित होते. या भेटीमुळे तर्कवितर्कांना उधाण आले आहे.जयंत पाटील यांची भूमिका चर्चेत गेल्या काही दिवसांपासून शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष राष्ट्रीय लोकशाही आघाडी म्हणजेच एनडीएमध्ये सहभागी होण्याच्या चर्चा सुरू आहेत. परंतु, त्याविषयी पक्षाकडून कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आली नव्हती. तर, दुसरीकडे स्वतः जयंत पाटील भाजपमध्ये सहभागी होणार की, शरद पवार यांची साथ सोडून अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत डेरेदाखल होणार याविषयी चर्चा सुरू आहे. त्यातच मंगळवारी रात्री राष्ट्रवादीचे पटेल आणि तटकरे हे फडणवीस यांच्या वर्षा या निवासस्थानी पोहोचले. त्या पाठोपाठ जयंत पाटील हेदेखील दाखल झाले. आधी दोन्ही राष्ट्रवादीच्या तिघा नेत्यांची स्वतंत्र चर्चा झाली. त्यानंतर चारही नेत्यांमध्ये जवळपास तासभर चर्चा झाली. परंतु, या बैठकीचा तपशील मिळू शकलेला नाही. चर्चेनंतर प्रफुल पटेल हे अमेरिकेला जाण्यासाठी रवाना झाले, तर त्यांच्या पाठोपाठ तटकरे आणि पाटील हेही बाहेर पडले. तीनही नेत्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही. दरम्यान, मी माझ्या मतदारसंघातील कामांच्या संदर्भात बोलण्यासाठी मुख्यमंत्र्यांना भेटलो होतो. केवळ पाचच मिनिटं देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत माझं बोलणं झालं. सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल हे सुद्धा वर्षावर असल्याची कुठलीही माहिती



मला नव्हती. आम्हा चौघांमध्ये कुठलीही राजकीय विषयावर चर्चा झाली नाही, असा दावा जयंत पाटील यांनी या भेटीनंतर केला.

# मुंबईतील ३ नामांकित हॉटेल्सचे परवाने निलंबित; तुकाराम मुंढेंची धडाकेबाज कारवाई...

**वृत्तसंस्था मुंबई**

अधिकारी तुकाराम मुंढे हे कडक शिस्तीचे अधिकारी म्हणून प्रसिद्ध आहेत. तुकाराम मुंढे सध्या अन्न आणि औषध प्रशासनाचे महाराष्ट्र राज्याचे आयुक्त आहेत. सर्वसामान्य जनतेच्या आरोग्यासाठी हे खातं अत्यंत महत्त्वाचं आहे. आपण खात असलेलं अन्न कितपत सुरक्षित आहे? हा महत्त्वाचा प्रश्न आहे. तसेच आजारपणात ज्या औषधांचं सेवन करतो ते देखील सुरक्षित असणं अपेक्षित आहे. याच अनुषंगाने सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याच्या सुरक्षेसाठी तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वात अन्न आणि औषध प्रशासनाकडून धडाकेबाज मोहीम सुरु आहे. सर्वसामान्य जनतेच्या आरोग्याला धोका पोहोचेल असं खाद्यपदार्थ विकणाऱ्यांवर तुकाराम मुंढे यांच्या खात्याकडून कारवाई केली जात आहे. त्यामुळे राज्यातील वेगवेगळे हॉटेल, रेस्टॉरंट, खाणावळ, कन्टिन, फूड स्टॉल या ठिकाणी अन्न आणि औषध प्रशासनाकडून कडक तपासणी केली जात आहे. अस्वच्छता आणि नियमांचं पालन न केल्या जाणाऱ्या आस्थापनांवर जागेवरच कडक कारवाई केली जात आहे. अशीच कारवाई मुंबईत करण्यात आली आहे. मुंबईत तब्बल ३ नामांकीत हॉटेलचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. त्यामुळे नियम न पाळणाऱ्या आणि हॉटेलच्या किचनमध्ये अस्वच्छता बाळगणाऱ्या हॉटेल व्यवसायिकांचे चांगलेच धाबे दणाणले आहेत. मुंबईच्या भेंडीबाजार येथे प्रसिद्ध असलेल्या मे. शालिमार हॉस्पिटॅलिटी प्रा. लि. या आस्थापनावर थेट निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. एफडीएने १६ एप्रिल २०२६ रोजी या हॉटेलमध्ये तपासणी केली होती. या तपासणीनंतर या हॉटेलला २८ एप्रिल रोजी सुधारणा नोटीस देण्यात आली होती. यानंतर एफडीएने १३ जुलैला मे. शालिमार हॉस्पिटॅलिटी प्रा. लि. येथे छापा टाकला. यावेळी पुनर्तपासणीत २५ गंभीर त्रुटी कायम असल्याचे निदर्शनास आले. स्वयंपाकघरातील ओले व घसरडे मजले, कच्च्या मालाची नोंद नसणे, पिण्याच्या पाण्याच्या चाचणीचा अभाव, खाद्यतेलाच्या गुणवत्तेच्या नोंदी नसणे, शाकाहारी व मांसाहारी अन्नाची योग्य विलगीकरण व्यवस्था नसणे तसेच कीटकप्रतिबंधक जाळीविना उघड्या खिडक्या अशा गंभीर त्रुटी आढळल्या. त्यामुळे अन्न आणि औषध प्रशासनाने १४ जुलैला या हॉटेलचा परवाना रद्द केला आहे. भेंडीबाजार येथील प्रसिद्ध नूर मोहम्मदी हॉटेलचा देखील परवाना रद्द करण्यात आला आहे. एफडीएने सोमवारी इथे छापा टाकला होता. यावेळी स्वयंपाकघरातील मजल्यांवर काळ्या तेलाचे जाड थर, कबाब विभागाजवळ उघड्या खिडक्यांमुळे




माश्या, कीटक व कावळ्यांचा मुक्त प्रवेश, भिंती व छतांवर निघालेला रंग व तेलाचे थर, कच्च्या मालाची अस्वच्छ साठवण, पुरवठादारांच्या नोंदींचा अभाव, जुनी व अस्वच्छ भांडी वापरणे, पिण्याच्या पाण्याच्या तपासणीच्या नोंदी नसणे तसेच कीटक नियंत्रणासाठी आवश्यक ड्रेनेज व्यवस्था नसल्याचे आढळून आले. यामुळे या हॉटेलचा परवाना निलंबित करण्यात आला आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळींचा प्रहरी!



# डेटा सेंटर्सची तहान



भारत सध्या डिजिटल परिवर्तनाच्या द्रुतगती महामार्गावरून धाव घेत आहे. यूपीआयचा वापर सर्वसामान्य भारतीयांच्या अंगवळणी पडला आहे आणि कृत्रिम बुद्धिमत्तादेखील (आर्टिफिशिअल इंटेलिजन्स - एआय) आता आपल्या जीवनाच्या प्रत्येक पैलूला स्पर्श करू लागली आहे. आपल्या हातातील मोबाइलमुळे आपण क्षणोक्षणी या नवपर्वाशी जोडले गेलेलो आहोत. हा सर्व डिजिटल व्यवहार ज्या आधारे होत आहे तो आहे डेटाचा. हा महाकाय आणि सर्वव्यापी डेटा साठवण्याची ठिकाणे म्हणजे डेटा सेंटर्स. एआय आणि त्यावर आधारित डिजिटल सेवांचे प्रमाण वाढत आहे, तसे या डेटा सेंटर्सनाही अधिक महत्त्व येत आहे. भारताने या डिजिटल परिवर्तनात आपल्या आर्थिक विकासाची संधी म्हणून जगभरातील डेटा सेंटर्सचे केंद्र होण्याचे धोरण अवलंबले आहे. त्यासाठीचे तंत्रकुशल मनुष्यबळ ही आपली जमेची बाजू ठरत आहे. त्याजोडीला केंद्र व राज्य सरकारे करसवलतीही देऊ करत आहेत. त्यामुळे ॲमेझॉन, गुगल, मायक्रोसॉफ्ट या बलाढ्य जागतिक तंत्रकंपन्या आणि रिलायन्स, अडानी यांसारखे भारतीय बहुराष्ट्रीय उद्योगसमूह या देशातील डेटा सेंटर्सचा व्याप वाढवत चालले आहेत. डेटा सेंटर्सच्या विस्तारालाही दुसरी बाजू आहे. ही डेटा सेंटर्स बारा महिने, चोवीस तास कार्यरत असतात. त्यामुळे या केंद्रांतून प्रचंड प्रमाणावर धग निर्माण होत असते. ती आटोक्यात ठेवली नाही, तर ही केंद्रे बंद पडून मोठे नुकसान संभवते. ते रोखण्यासाठी विजेची आणि पाण्याची प्रचंड गरज भासते. यंदाच्या मोसमी पावसाच्या हंगामाची कोरडी सुरुवात अनुभवलेल्या नागरिकांना त्यांच्या वाट्याचे पिण्याचे आणि शेतीसाठीचे पाणी पुरेसे उपलब्ध करून देत येत नसताना डेटा सेंटर्सची पाण्याची गरज भागवणे हे सरकारसाठी कसरतीचे ठरण्याची चिन्हे आहेत.भारत हा कृषिप्रधान देश मानला जातो. परंतु आजही आपल्या देशातील जवळपास निम्मे शेतीक्षेत्र सिंचनाखाली आलेले नाही. दुसरीकडे, वाढते नागरीकरण आणि जगातील सर्वाधिक लोकसंख्येची गरज यांमुळे आपल्या देशात पिण्याच्या पाण्याची गरजही भागवणे जिकिरीचे ठरले आहे. जगाची १८ टक्के लोकसंख्या असणाऱ्या भारतात जगातील फक्त ४ टक्के गोड्या पाण्याचे साठे आहेत. या पार्श्वभूमीवर, नवउद्योग व अर्थविकासासाठीची पाण्याची गरज या विषयाकडे पाहणे गरजेचे आहे. डेटा सेंटर्समधील सर्व्हर्सची धग कमी करण्यासाठी काही प्रमाणात वातानुकूलनाचा आणि त्याहून अधिक प्रमाणात पाण्याचा वापर करून ही केंद्रे थंड ठेवण्याचा मार्ग अवलंबावा लागतो. यामध्ये संबंधित सर्व्हर्सभोवती पाणी खेळवले जाते आणि त्यातून निर्माण होणारी वाफ शीतकरण मनोरे उभारून हवेत सोडली जाते. यात सहसा पाण्याचा फेरवापर होत नाही आणि २४ तास ही केंद्रे चालू ठेवण्यासाठी नव्याने पाण्याची गरज भासत राहते. बड्या बहुराष्ट्रीय तंत्रकंपन्यांची अतिविशाल डेटा सेंटर्स दिवसाला १२ ते १९ कोटी लिटर एवढ्या पाण्याचा वापर करतात! एका मध्यम आकाराच्या शहराची पाण्याची गरज भागवण्याएवढे हे प्रमाण आहे! भारतातील डेटा सेंटर्स ही प्रामुख्याने मुंबई, चेन्नई आणि दिल्ली या तीन ठिकाणी केंद्रित आहेत. त्यातही एकट्या मुंबईत देशातील ५३ टक्के डेटा सेंटर्स आहेत. चेन्नईत २०, दिल्लीत १०, हैदराबादमध्ये ५ आणि पुण्यात ४ टक्के डेटा सेंटर्स आहेत. सरकारने या केंद्रांना अत्यावश्यक सेवांमध्ये समाविष्ट केले आहे. भारतातील साठ टक्के लोकसंख्येपर्यंत इंटरनेट पोचले आहे आणि हे प्रमाण नजीकच्या भविष्यात वाढणारच आहे. एवढ्या अवाढव्य लोकसंख्येच्या आर्थिक, वैद्यकीय आणि व्यक्तिगत माहितीचा साठा देशाबाहेरील डेटा सेंटर्सच्या हवाली करणे हे राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने जोखमीचे आहे. तो डेटा भारतीय कायद्यांच्या चौकटीत राहणेही महत्त्वाचे आहे.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# 'महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन कायदा' हिंदू देवस्थाने संपवणारा; मंदिर महासंघाचा इशारा

■ सावंतवाडी/वृत्तसंस्था

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या वतीने प्रस्तावित असलेला 'महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप अधिनियम २०२६' हा कायदा येत्या पावसाळी अधिवेशनात मंजूर करण्याचे शासनाचे नियोजन आहे. मात्र, हा कायदा राज्यातील हजारो हिंदू देवस्थानांचे स्वायत्त अस्तित्व आणि त्यांच्या उत्पन्नाचे पारंपरिक स्त्रोत संपविणारा असून धार्मिक स्वातंत्र्य आणि पूजा-अर्चेवर गदा आणणारा आहे, असा गंभीर आरोप महाराष्ट्र मंदिर महासंघाचे राज्य संघटक संजय जोशी यांनी येथे आयोजित पत्रकार परिषदेत केला.

वक्फ बोर्ड आणि चर्चच्या जमिनी वगळून केवळ हिंदू मंदिरांच्या जमिनींवर डोळा ठेवणारा हा डाव मंदिर विश्वस्त कधीही यशस्वी होऊ देणार नाहीत, असा इशाराही त्यांनी दिला. सावंतवाडी येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. या वेळी सनातन संस्थेचे धर्मप्रचारक सद्गुरु सत्यवान कदम, हिंदू जनजागृती समितीचे राजेंद्र पाटील, विरेश माईणकर, मंदिर महासंघ सिंधुदुर्ग जिल्हा संयोजक शिवराम देसाई, यशवंत परब, हेमंद्र गोवेकर आदी उपस्थित होते.

पत्रकार परिषदेत बोलताना संजय जोशी म्हणाले की, देशात भाजपची मंदिरांबाबतची भूमिका सकारात्मक असताना महाराष्ट्रातील हिंदुत्ववादी सरकारच्या काळात नेमके काय झाले, असा प्रश्न निर्माण होतो. तत्कालीन काँग्रेस सरकारच्या काळातही असाच निर्णय घेण्याचा प्रयत्न झाला होता, मात्र विरोधानंतर तो रद्द करण्यात आला.



आताच्या कायद्यामुळे देवस्थानांची सुमारे साडेचार लाख हेक्टर जमीन धोक्यात येणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराजांनी देवस्थानांना दिलेल्या इनामांच्या सनदी काढून घेण्याचे काम हे सरकार करत आहे का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. या अधिनियमाच्या आदेशाविरोधात कोणत्याही दिवाणी न्यायालयात दाद मागता येणार नाही, अशी तरतूद करण्यात आल्याने हिंदू समाजाने न्याय कोणाकडे मागायचा, असा प्रश्न त्यांनी केला. हा कायदा केवळ हिंदू मंदिरांना लागू करून संविधानातील समानतेच्या तत्त्वाचा भंग केला जात असून, यामुळे सामाजिक आणि धार्मिक संघर्ष निर्माण होऊ शकतो, अशी भीती त्यांनी व्यक्त केली.

**'अँटी लँड ग्रॅबिंग ॲक्ट' लागू करण्याची मागणी..** महासंघाच्या वतीने शासनाकडे मागणी करण्यात आली आहे की, देवस्थान जमिनींना विशेष संरक्षण देण्यासाठी गुजरातच्या धर्तीवर 'अँटी लँड ग्रॅबिंग ॲक्ट' लागू करावा आणि ७/१२ उताऱ्यावर 'देवस्थान जमीन प्रतिबंधित सत्ता प्रकार' अशी स्पष्ट नोंद करण्यात यावी. या संदर्भात महाराष्ट्रभरातून ३०० हून अधिक निवेदने देण्यात आली असून, लवकरच सिंधुदुर्गचे पालकमंत्री नितेश राणे यांचीही भेट घेण्यात येणार असल्याचे जोशी यांनी सांगितले. हिंदू जनजागृती समितीचे राजेंद्र पाटील यांनी सांगितले की, कायद्यानुसार देवस्थानच्या जमिनी या अहस्तांतरणीय आहेत. मात्र, कुळाच्या नावाखाली या जमिनी गिळंकृत करण्याचा आणि भू-माफियांच्या घशात घालण्याचा हा कट आहे. राज्यकर्ते आणि बिल्डर यांचे साटेलोटे जगजाहीर असून, मंदिरांच्या जमिनी हडप करून हिंदूंची मंदिर संस्कृती नष्ट करण्याचा हा घाट आम्ही तीव्र आंदोलनाद्वारे हाणून पाडू, असा इशारा त्यांनी दिला.

## 'पक्षाची बदनामी थांबवा, ठामपणे भूमिका मांडा'

■ मुंबई/वृत्तसंस्था

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाची मंगळवारी सायंकाळी उशिरा बैठक पार पडली. या बैठकीत पक्षाची बदनामी करणाऱ्यांना सडेतोड उत्तर द्या. पक्षाची बदनामी थांबवण्यासाठी वरिष्ठ नेत्यांनी ठामपणे आपली भूमिका मांडावी. पक्षात कोणतीही फूट पडणार नाही, पक्ष एकसंध आहे, असा संदेश लोकांपर्यंत पोहोचवा, अशा सूचना उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अध्यक्ष सुनेत्रा पवार यांनी वरिष्ठ नेत्यांना दिल्या.

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे आमदार, मंत्री आणि पदाधिकारी यांची बैठक मंगळवारी सायंकाळी उशिरा पार पडली. पक्षात फूट पडणार असल्याचा रोहित पवार यांचा आरोप आणि ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांच्या पदावरून निर्माण झालेल्या संभ्रमानंतर झालेली ही पक्षाची पहिलीच बैठक होती. बैठकीच्या सुरुवातीलाच सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल यांच्या पदाविषयी निर्माण झालेल्या संभ्रमाबाबत सुनेत्रा पवार यांनी सारवासारव केली. पक्षात



ज्येष्ठ नेत्यांचा योग्य सन्मान केला जाईल, असेही त्या म्हणाल्या. पक्षात फूट पडणार आहे, २२ आमदार शरद पवार गटात सहभागी होणार आहेत, असे सांगून पक्षाची बदनामी केली जात आहे, त्यांना सडेतोड उत्तर द्या. पक्षात कुठली फूट पडणार नाही. पक्ष एकसंध आहे, असा संदेश समाजात गेला पाहिजे. त्या विषयी वरिष्ठ नेत्यांनी माध्यमांमध्ये बोलले पाहिजे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. माध्यमांमध्ये पक्षाची भूमिका मांडण्याची जबाबदारी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, ज्येष्ठ नेते प्रकाश सोळंके, छगन भुजबळ, अनिल पाटील यांच्यावर सोपविण्यात आली.

## अमित शहा शेतकऱ्यांना दिलासा देणार; दिल्लीतील कांदा, साखर उद्योगाबाबतच्या उद्याच्या बैठकीकडे लक्ष

■ मुंबई/वृत्तसंस्था

राज्यात कोसळलेले कांद्याचे दर आणि साखर उद्योगासमोरील आर्थिक अडचणींबाबत केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली दिल्ली येथे आज, बुधवारी बैठक होणार आहे. या बैठकीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे – पाटीलराज्यात कोसळलेले कांद्याचे दर आणि साखर उद्योगासमोरील आर्थिक अडचणींबाबत केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली दिल्ली येथे आज, बुधवारी बैठक होणार आहे. ल यांच्यासह अन्य मंत्री दिल्लीला जाणार आहेत.

केंद्र सरकारने साखर निर्यातीवर बंदी घातल्यामुळे साखर उद्योग अडचणीत आला आहे. २०१९ मध्ये साखरेचे किमान विक्री मूल्य (एमएसपी) ३१ रुपये प्रति किलो निश्चित करण्यात आले होते. त्यानंतर २०२६ पर्यंत एमएसपीमध्ये कोणतीही वाढ झाली नाही. पण, २०१९ मधील २,७५० रुपये प्रति टन असलेली एफआरपी वाढून २०२६ मध्ये २९.१० टक्क्यांनी वाढून ३५५० रुपयांवर गेली आहे. साखरेचा दर २०१९ पासून स्थिर आणि एफआरपीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने उद्योगाला आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यासह इथेनॉलच्या खरेदी दरातही अपेक्षित वाढ झाली नाही. इथेनॉल प्रकल्प



आणि प्रकल्पाच्या विस्तारीकरणाला देण्यात येणाऱ्या व्याज सवलत, अनुदानेही १७. ११ कोटी रखडले आहेत. या सर्व विषयांवर बैठकीत सविस्तर चर्चा होणार आहे.

राज्यात कांदा दराचा प्रश्न चिघळला आहे. शेतकऱ्यांच्या कांद्याला एक रुपये, सव्वा रुपये प्रति किलो दर मिळत आहे. कांदा दराच्या प्रश्नावरून शेतकऱ्यांमध्ये मोठा असंतोष निर्माण झाला आहे. महाविकास आघाडीने या प्रश्नी मंगळवारी चांदवड येथे मोर्चा काढल्यामुळे कांद्याच्या दराचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. नाफेड, एनसीसीएफकडून फक्त दोन लाख टन खरेदी होणार आहे. खरेदी गतवर्षीच्या तुलनेत कमी आणि कमी दराने होणार असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये मोठा असंतोष निर्माण झाला आहे. या प्रश्नावरही शहा यांच्या उपस्थितीत चर्चा होणार आहे.

## 'कॉक्रोच जनता पार्टीचा आवाज जेवढा दाबाल, तेवढेच ते उसळून येतील'

■ अमरावती/वृत्तसंस्था

कॉक्रोच जनता पार्टीचे अकाउंट बंद (ब्लॉक) करण्यात आल्यानंतर देशभरातून त्यावर प्रतिक्रिया उमटत असतानाच सत्तारूढ शिवसेना शिंदे गटाचे आमदार बच्चू कडू यांनी देखील या मुद्यावर परखड भाष्य केले आहे. बच्चू कडू म्हणाले, केंद्र सरकारने या तरूणाईचा आवाज दाबण्याचे काम करू नये, त्यांची ऊर्जा विधायक कामांसाठी वापरायला हवी.

बच्चू कडू म्हणाले, तरूणांनी केवळ व्हॉट्सॲपपुरते मर्यादित न राहता, रस्त्यावर उतरले पाहिजे. प्रत्यक्ष काम केले पाहिजे. सरकारवर अंकुश ठेवला पाहिजे. यात वाईट काय आहे. चांगले काम करायचे असेल, तर त्यात पक्ष ही मर्यादा राहत नाही. केंद्र सरकारने त्यांचा आवाज दाबू नये. जेवढा त्यांचा आवाज दाबला जाईल, तेवढाच तो उसळून बाहेर येईल. कधी-कधी केंद्र सरकार चुकीचा निर्णय घेत असेल, तर ते थांबवले पाहिजे. जर तरुणाई अशा पद्धतीने समोर येत असेल, तर त्यांची ऊर्जा विधायक कामांकडे कशी वळवता येईल, चांगल्या कामांसाठी ती कशी वापरता येईल, याचा विचार व्हायला हवा. तसे प्रयत्न आपण केले पाहिजे.

बच्चू कडू म्हणाले, माझे काम शिवसेना



वाढवण्याचे आहे. कोण मंत्री होणार, कोण जिल्हा प्रमुख होणार, कुणाला पद मिळणार याकडे आपले लक्षच नाही. आमचे लक्ष आहे, पिक घेण्याकडे. ते पीक कुणाला द्यायचे, ते कोणाला विकणार, याकडे आम्ही पाहणार नाही. उत्तम शेती करायची हेच आमचे उद्दिष्ट आहे. पक्षसंघटनेत भरघोस पीक घेण्याकडे आम्ही अधिक लक्ष केंद्रित करणार आहोत. प्रचंड ताकदीनं, मेहनतीनं आम्हाला शिवसेना उभी करायची आहे. त्यामुळे कोण मंत्री कोण आमदार, याविषयी आमचे काहीही घेणे-देणे नाही.

बच्चू कडू म्हणाले, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आंदोलनासाठी रस्त्यावर उतरले, त्याबद्दल त्यांचे आभारच मानले पाहिजेत. ज्या राज्यात काँग्रेसचे सरकार आहे, त्या ठिकाणी कांद्याला काय भाव दिला जातो, हे तपासले पाहिजे. विरोधात आहे, म्हणून त्यांना शेतकरी आठवतो. सत्तेत असताना शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा त्यांना विसर पडतो. आम्ही सत्तेत असूनही शेतकरी, शेतमजूर, दिव्यांगांच्या प्रश्नांखेरीज आम्ही बोलूच शकत नाही. आमच्या डोक्यात सर्वप्रथम शेतकरी, दिव्यांग बांधव राहतील, हे आम्ही आधीपासूनच सांगत आलो आहे. आगामी खरीप हंगामासाठी शेतीच्या मशागतीसाठी ट्रॅक्टरला डिझेल पुरवायला हवे. ट्रॅक्टरधारकांना अधिक सूट दिली पाहिजे. शेतकऱ्यांसाठी अतिरिक्त डिझेल आरक्षित केले पाहिजे.

# बाळ अंध असल्याने गर्भपाताचा तगादा, माऊलीने तरीही लेकराला जन्म दिला; अंध आई अन् लेकराला संपवलं

**जळगाव/वृत्तसंस्था**

ज्या डोळ्यांना कधी जग पाहता आलं नाही, त्या अंध मातेला विहिरीच्या पूजा करण्याच्या बहाण्याने प्रत्यक्ष मृत्यूच्या दारात नेलं जाईल, याची पुसटशीही कल्पना नव्हती. आपल्या अंध पत्नी आणि तीन वर्षांच्या अंध मुलाला विहिरीत ढकलून हत्या केल्याची संतापजनक घटना जळगाव जिल्ह्यात घडली आहे. यावल तालुक्यातील किनगाव येथील दोघेही पती-पत्नी अंध असल्यानं जन्माला आलेलं अपत्यही अंध जन्माला आलं. याच रागातून सासू आणि पतीने मिळून एका साडेतीन वर्षाच्या निष्पाप अंध बालकाला विहिरीत फेकून देऊन त्याचा खून केला. तर सुनेलाही विहिरीत ढकलून मारण्याचा प्रयत्न केल्याची खळबळजनक घटना किनगाव शिवारात घडली आहे.काल सोमवारी रोजी सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास किनगाव शिवारातील आरोपींच्या मालकीच्या शेतात ही घटना घडली. फिर्यादी सरस्वती स्वप्निल पाटील (वय




27) आणि तिचा पती स्वप्निल भागवत पाटील (वय 34) हे दोघे विहिरीची पूजा करण्यासाठी शेतात गेले होते. यावेळी विहिरीजवळ असताना सासू आशाबाई भागवत पाटील हिने सरस्वती आणि तिच्या साडेतीन वर्षाच्या मुलाला विहिरीत जोराचा धक्का देऊन पाडलं.विहिरीत पडल्यानंतर सरस्वतीने तेथील लाकडी फाउंडेशनचा आधार घेतल्याने ती बचावली. विहिरीत स्वतःचा जीव वाचवण्यासाठी त्या मातेनं काळजाचा थरकाप उडवणारा टाहो फोडला, पण दुर्दैवाने तिच्या कुशीतील सोन्यासारख्या चिमुकल्याचा पाण्यात गुदमरून अंत झाला. पोटच्या गोळ्याला कायमचं गमावल्याचं अथांग दुःख आणि रक्ताच्याच नात्यांनी केलेल्या या अमानुष विश्वासघातामुळे ती अंध माता आज सुन्न होऊन अश्रू ढाळत आहे. अंध मुलगा कृष्णा पाण्यात बुडाल्यानं त्याचा जागीच मृत्यू झाला. सुरुवातीला ही घटना केवळ एक अपघात असल्याचा बनाव करण्यात आला होता. विहिरीत पडल्यानं महिला जखमी झाली होती, तिला तातडीने सिव्हिल हॉस्पिटल, जळगाव येथे उपचारासाठी दाखल करण्यात आलं होतं.सुरुवातीला मानसिक धक्क्यामुळे तिने पोलिसांना कोणताही जबाब दिला नव्हता. त्यामुळे पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली होती. परंतु, घटनेची वेळ आणि परिस्थिती संशयास्पद वाटल्यानं, लहान मुलाच्या अंत्यविधीनंतर रात्री उशिरा पोलिसांनी जखमी महिलेची सखोल विचारपूस केली. यावेळी महिलेनं तिच्यासोबत घडलेला हा क्रूर प्रकार पोलिसांसमोर मांडला. सासूने विहिरीत ढकललं आणि त्यात पतीचाही सहभाग असल्याची तक्रार तिने नोंदवली. या घटनेमागील कारण अत्यंत वेदनादायी आहे.फिर्यादी सरस्वती ही 70 टक्के अंध असून तिचा पती स्वप्निल हा 100 टक्के अंध आहे. गर्भधारणेदरम्यान सोनोग्राफीमध्ये होणारं बाळही अंध असेल, असं डॉक्टरांनी सांगितलं होतं. त्यामुळे आरोपी पती हा गर्भपात करण्यासाठी दबाव आणत होता. मात्र, सरस्वतीने हट्ट धरून बाळाला जन्म दिला. याच कारणावरून त्यांच्यात सतत वाद होत होते आणि यामुळेच सरस्वती गेल्या अडीच वर्षापासून तिच्या माहेरी राहत होती. दरम्यान, या वादाचा अंत या दुर्दैवी घटनेनं झाला. या प्रकरणी यावल पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. २५४/२६, भारतीय न्याय संहिता (BNS) कलम १०३(१) (खून), १०९(१) (खुनाचा प्रयत्न), आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस प्रशासनाने तात्परतेने कारवाई करत आरोपी पती स्वप्निल भागवत पाटील आणि सासू आशाबाई भागवत पाटील यांना ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे.

## 83 तासांत मोशीतील रेस्क्यू ऑपरेशन पूर्ण, कचऱ्याच्या ढिगाऱ्यात 8 जणांचा करुण अंत

**पिंपरी/वृत्तसंस्था**

मोशी येथील कचऱ्याच्या डोंगर तीन मजली प्रशासकीय इमारतीवर कोसळून झालेल्या दुर्घटनेत आतापर्यंत आठ कामगारांचा मृत्यू झाला आहे. बुधवारी (आठ जुलै) मोशी कचरा डेपो येथे ही दुर्घटना घडल्यानंतर गुरुवारी (नऊ जुलै) पहिला मृतदेह बाहेर काढण्यात आला होता. त्यानंतर शनिवारी (११ जुलै) सात मृतदेह बाहेर काढण्यात आले. या कामगारांव्यतिरिक्त वामन कसबे नावाचा एक कामगार बचाव पथकाला सापडलेला नाही. तो आणि त्याच्या व्यतिरिक्त अजून कोणी ढिगाऱ्याखाली अडकले आहे का, याचा शोध रात्री उशिरापर्यंत सुरू होता. मोशी कचरा डेपो येथे बुधवारी दुपारी एक ते दोनच्या सुमारास कचऱ्याचा डोंगर कोसळून अँटनी लोरा या वेस्ट टू एनर्जी प्रकल्पाची तीन मजली प्रशासकीय इमारत कोसळली. यानंतर पोलिस, अग्निशमन दल, महापालिका प्रशासनाने घटनास्थळी धाव घेतली. 'एनडीआरएफ'ला पाचारण करण्यात आले. या इमारतीमध्ये एकूण २३ कामगार होते. एनडीआरएफ'ला बचावकार्यात अडचणी भासू लागल्याने भारतीय सैन्य दलाला पाचारण करण्यात आले. दोन्ही दलांनी प्रयत्न करून, इमारतीच्या आत अडकलेले सोमनाथ शेळके, सचिन दवडगाव, दादासाहेब आरडे, सुजाता शिंदे, रामप्रताप चव्हाण, रणवीर सिंह, विजय सपकाळ या कामगारांना बाहेर सुखरूप काढले. गुरुवारी पहाटे भूषण पाटील, महेश राऊत यांना सुरक्षित बाहेर काढण्यात यश आले.

मात्र, गुरुवारी सकाळी भावेश वाणी यांना बाहेर काढले असता त्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर, गुरुवारी आणि शुक्रवारी (दहा जुलै) दोन दिवस इमारतीच्या बाजूचा कचरा हटवून आणि इमारतीचा स्लॅब फोडून इतर कामगारांना बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरू झाले. मात्र, इमारतीच्या आसपासच्या मोठ्या प्रमाणात कचरा असल्याने बचावकार्यात अडथळा निर्माण झाला होता.गुरुवारी दुपारपासून ते शनिवारी (११ जुलै) दुपारपर्यंत हा कचरा हटविण्याचे काम सुरू होते. त्यानंतर शनिवारी दुपारी अडीचच्या सुमारास अक्षय सावंत या कामगाराचा मृतदेह बाहेर काढण्यात आला. पाचच्या सुमारास सुनील कोकरे या कामगाराचा मृतदेह बाहेर काढला.

## नियतीने आयुष्याला पूर्णविराम दिला, मोशी दुर्घटनेत अवघ्या 25 दिवसांच्या लेकराचं पितृछत्र हरपलं

**पुणे/वृत्तसंस्था**

'यावेळ खूप काम आहे. यावर्षी वारी राहू दे, पुढच्या वर्षी विठ्ठरायाच्या चरणी नक्की जाईन,' असा विचार करून 34 वर्षीय सुनील कोरके बुधवारी 8 जुलै रोजी नेहमीप्रमाणे कामावर गेले. मात्र नियतीच्या मनात काही औरच होतं. दुपारच्या जेवणाच्या सुट्टीत कॅन्टीनमध्ये बसून जेवायला सुरुवात करण्याआधीच मोशी येथील कचरा डेपो परिसरातील इमारतीवर कचऱ्याचा प्रचंड ढिगारा कोसळला आणि या भीषण दुर्घटनेत त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. एका क्षणात कोरके कुटुंबाचा आनंदी संसार उद्ध्वस्त झाला.मूळचे पंढरपूर येथील असलेले सुनील कोरके हे गेल्या 10 वर्षापासून पिंपरी-चिंचवड परिसरातील एका खासगी कंपनीत असिस्टंट मॅनेजर म्हणून कार्यरत होते. प्रामाणिक आणि मेहनती अशी त्यांची ओळख होती. 10 वर्षांपूर्वी मोठ्या उत्साहात त्यांचा विवाह झाला आणि संसाराला सुरुवात झाली. अवघ्या 25 दिवसांपूर्वी त्यांच्या घरी एका गोंडस मुलाचा जन्म झाला होता. घरात नव्या पाहुण्याच्या आगमनानं कुटुंबात आनंदाचं वातावरण होतं. आपल्या नवजात मुलाला कुशीत घेऊन त्याच्यासाठी अनेक स्वप्नं पाहणाऱ्या सुनील यांच्या आयुष्याला मात्र नियतीने थांबा दिला. पितृत्वाचा आनंद मनसोक्त अनुभवण्यापूर्वीच काळाने त्यांना आपल्या कवेत घेतलं.सुनील यांचे वडील गावाकडे शेती करतात, तर त्यांचा भाऊ अनिल कोरके वृद्ध आई-वडिलांची जबाबदारी सांभाळतो. नोकरीनिमित्त शहरात राहत असूनही सुनील यांचे मन कायम पंढरपूर आणि विठ्ठल भक्तीत रमलेले असायचे. दरवर्षी माऊली



आणि तुकोबांच्या पालखी सोहळ्यात सहभागी होऊन विठ्ठल नामाचा गजर करणाऱ्या सुनील यांना यंदा कामाच्या व्यापामुळे वारीला जाता आले नव्हते. 'यंदा नाही, पुढच्या वर्षी नक्की वारी करेन,' हा त्यांचा निर्धार आयुष्यातील शेवटचा ठरला. एका बाजूला पंढरपूरमध्ये विठ्ठल भक्तांचा जल्लोष सुरू असताना, दुसऱ्या बाजूला त्याच पंढरपूरच्या एका वारकऱ्याची जीवनवारी मोशी दुर्घटनेत कायमची थांबली.मोशी येथील कचऱ्याच्या डोंगर तीन मजली प्रशासकीय इमारतीवर कोसळून झालेल्या दुर्घटनेत आतापर्यंत आठ कामगारांचा मृत्यू झाला आहे. बुधवारी (आठ जुलै) मोशी कचरा डेपो येथे ही दुर्घटना घडल्यानंतर गुरुवारी (नऊ जुलै) पहिला मृतदेह बाहेर काढण्यात आला होता. त्यानंतर शनिवारी (११ जुलै) सात मृतदेह बाहेर काढण्यात आले. या कामगारांव्यतिरिक्त वामन कसबे नावाचा एक कामगार बचाव पथकाला सापडलेला नाही. तो आणि त्याच्या व्यतिरिक्त अजून कोणी ढिगाऱ्याखाली अडकले आहे का, याचा शोध रात्री उशिरापर्यंत सुरू होता.

## दोन महत्त्वाच्या उड्डाणपुलांच्या कामांना वेग; शीव-पनवेल महामार्गावर कोंडी फुटणार

**मुंबई/वृत्तसंस्था**

मुंबईतील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी महापालिकेकडून दोन नव्या पुलांचं काम सुरू होतं. शहरात विद्याविहार रेल्वे उड्डाणपूल आणि मानखुर्द महाराष्ट्र नगर पुलाचं काम वेगाने सुरू असून या दोन्ही प्रकल्पांसाठी डेडलाइन दिली आहे. अनेक काळापासून प्रलंबित पुलांचं काम पूर्ण झाल्यावर विद्याविहार आणि शीव-पनवेल महामार्गावर वाहतूक कोंडी फुटणार आहे.मुंबई महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर यांनी शनिवारी दोन्ही प्रकल्पांची पाहणी केली आणि त्यावेळी ही अपडेट दिली. तब्बल ३५ वर्षांची प्रतीक्षा संपणार असून, विद्याविहार रेल्वे उड्डाणपुलाचं काम ३१ ऑगस्टपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश यावेळी त्यांनी दिले आहेत. या पुलाचं तब्बल ८०% टक्के काम पूर्ण झालं आहे. विद्याविहारमध्ये पूर्व ते पश्चिम प्रवास करताना तब्बल ४० ते ४५ मिनिटं वेळ जातो. पण या पुलाचं काम पूर्ण होताच विद्याविहार पूर्व ते पश्चिम प्रवास १० ते १५ मिनिटांत करणं शक्य होणार आहे.या उड्डाणपूल ६५० मीटर लांब असून पूर्वेतील लाल बहादूर शास्त्री मार्गाला (LBS Road) पश्चिमेतील रामकृष्ण चेंबूरकर मार्गाशी जोडणार आहे. थेट मध्य रेल्वेच्या रुळांवर हा पूल उभारला आहे. या पुलासाठी पहिला प्रस्ताव महापालिकेकडे १९९१ मध्ये मांडला होता. त्यानंतर २०१६ मध्ये प्रकल्पासाठी निविदा काढण्यात आली आणि मग बांधकाम सुरू झालं. पण त्यानंतरही अनेक अडथळ्यांमुळे प्रकल्पाच्या बांधकामाला विलंब झाला.

विद्याविहार पुलासाठी १७८ कोटी रुपयांचा खर्च झाला आहे. १०० मीटर उंच स्टील गर्डरवर मार्ग बांधला आहे. या मार्गाच्या





बांधकामादर्यान तब्बल २१३ झाडं बाधित होणार होती अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. त्यापैकी ७७ झाडं तोडण्यात आली, ८५ झाडांचं पुनर्रोपन करण्यात आलं आणि ५१ झाडं जागेवरचं असल्याची माहिती त्यांनी दिली आहे. वाहनचालकांसह पादचाऱ्यांसाठी उड्डाणपुलापासून रेल्वे स्थानकांच्या पदपथापर्यंत मार्ग मिळणार आहे. विद्याविहार पुलासह मानखुर्द-महाराष्ट्र नगर उड्डाणपुलाचंही काम वेगाने सुरू असून ऑगस्ट २०२७ पर्यंत हा पूल वाहनचालकांसाठी खुला करण्यात येणार असल्याची माहिती अभिजीत बांगर यांनी यावेळी दिली. शीव-पनवेल महामार्गावर टी-जंक्शनवर सर्वाधिक वाहतूक कोंडी होते. नवी मुंबई, पुणे आणि मुंबईतील वाहनांची मोठ्या प्रमाणात वाहतूक होते. सिग्नलवरील ट्रॅफिक जॅममध्ये प्रवाशांना १५ मिनिटांपेक्षा अधिक वेळ थांबावं लागतं.या प्रस्तावित पुलावर दोन मार्गिका असतील. हा मार्ग थेट घाटकोपर-मानखुर्द उड्डाणपुलाला जोडणार आहे. शीव-पनवेल महामार्गावरील टी-जंक्शनपासून सुरू होऊन जीएमएलआरपर्यंत पोहोचेल. एक मार्गिका १.४७ किमी लांब असेल आणि दुसरी मार्गिका १.९३ किमी लांब असेल. या मार्गासाठी १,९५८ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. प्रत्येक मार्गिका दोन पदरी असेल. ६.५ ते ८.५ रुंदीचे हे मार्ग असतील. घाटकोपरच्या दिशेने नवी मुंबई, मुंबई आणि पुण्याला प्रवास करणाऱ्या वाहनांची कोंडीतून सुटका होणार आहे.

# भारताने इंग्लंडला पहिल्याच वनडेत लोळवलं, 6 विकेटने विजय मिळवत मालिकेत 1-0ने आघाडी

■ मुंबई/वृत्तसंस्था

पहिल्या वनडे सामन्यामध्ये भारतीय संघाने इंग्लंडचा ६ विकेटने पराभव केला. भारताने या मालिकेची सुरूवात विजयाने करत १-० ने मालिकेत आघाडी घेतली आहे. आयर्लंड आणि इंग्लंडच्या टी-२० मालिकेत एकही विजय मिळवता आला नव्हता. वनडेमध्ये भारतीय संघाने हा विजयाचा दुष्काळ संपवला आहे. या सामन्यामध्ये इग्लंडने टॉस जिंकत प्रथम बॅटिंग करण्याचा निर्णय घेतला होता. भारतीय संघाच्या गोलंदाजांनी ४७.५ ओव्हरमध्ये २५८ धावांवर इंग्लंड संघाला ऑल आऊट केले होते. इंग्लंडकडून जो रूटने सर्वाधिक नाबाद ७६ आणि लियान डॉसनने ६८ धावा केल्या होत्या. या आव्हानाचा पाठलाग करताना भारताकडून कर्णधार शुभमन गिलने सर्वाधिक ८० धावा केल्या होत्या. मात्र दुखापतीमुळे त्याला मैदान सोडावं लागलं. अक्षर पटेलने नाबाद ५७ धावा केल्या तर वॉशिंग्टन सुंदरनेही नाबाद ५२ धावा करत विजयावर शिक्कामोर्तब केले.इंग्लंडची सुरूवात काही चांगली झाली



नव्हती. कारण भारताने इंग्लंडचा अर्धा संघ ८० धावांवर माघारी पाठवला होता. गुरनूर ब्रारने एकाच ओव्हरमध्ये दोन विकेट घेतल्या. त्यानंत बुमराहने हॅरी ब्रुकला आऊट करत तिसरा धक्का दिला होता. त्यापाठोपाठ प्रसिद्ध कृष्णानेही दोन विकेट घेत इंग्लंडला बॅकफूटला ढकलले. परंतु जो रूट ७६ चेंडूत ७६ धावा आणि लियान डॉसनची ६८ धावांची अर्धशतकी खेळी करत दोघांनी सातव्या विकेटसाठी १२१ धावांची केलेली भागीदारी इंग्लंडसाठी महत्त्वाची ठरली. भारताकडून अक्षर पटेलने ४, प्रसिद्ध कृष्णा आणि गुरनूर ब्रार यांनी २-२ विकेट घेतल्या.भारतीय संघ या आव्हानाचा पाठलाग करताना विराट कोहली आणि रोहित शर्मा लवकर आऊट झाले होते. भारताची अवस्था ४८-२ अशी झाली होती त्यामुळे भारतावर दडपण आले होते. मात्र श्रेयस अय्यर आणि शुभमन गिल यांनी १०१ धावांची भागीदारी करत सामना भारताच्या बाजूने झुकवला होता. दुखापतीमुळे गिल ८० धावांवर रिटायर हर्ट झाला होता. त्यानंतर अय्यर ३५ धावांवर रन आऊट झाला, त्यापाठोपाठ राहुलही १ धाव काढून माघारी परतला मात्र अक्षर पटेल आणि वॉशिंग्टन सुंदर यांनी १०५ चेंडूत नाबाद १०५ धावांची भागीदारी करत सामना खिशात घातला.दरम्यान, आजच्या सामन्यामध्ये अक्षर पटेल याला सामनावीर म्हणून गौरवण्यात आले. अक्षरने आज ९.५ ओव्हरमध्ये ६२ धावा देत ४ विकेट घेतल्या होत्या.भारत अडचणीत असताना ५२ चेंडूत नाबाद ५७ धावा केल्या. यामध्ये त्याने ५ चौकार आणि १ षटकार लगावला. भारताने हा सामना जिंकत मालिकेत १-० ने आघाडी घेतली असून दुसरा वनडे सामना १६ जुलैला होणार आहे.

## एक द्विशतक, शेवटच्या वनडेमध्ये वादळी शतक तरीही प्लेइंग 11 मध्ये जागा नाहीच

■ मुंबई/वृत्तसंस्था

भारत आणि इंग्लंडमधील पहिल्या वनडे सामन्याला सुरूवात झाली आहे. तीन सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना आज पार पडत असून भारताचे स्टार खेळाडू रोहित शर्मा, विराट कोहली आणि शुभमन गिल हे संघात परतले आहेत. मात्र आजच्या प्लेइंग ११ मध्ये स्टार खेळाडू ज्याला मागील सामन्यात शतक ठोकूनही जागा मिळाली नाही. कोण आहे तो मॅचविनर खेळाडू जाणून घ्या.भारताकडून आज मॅचविनर खेळाडू असलेल्या ईशान किशन याला संधी मिळाली नाही. ईशानने शेवटच्या वनडे सामन्यामध्ये वादळी शतकी खेळी केली होती. त्यानंतर इंग्लंडमध्ये झालेल्या टी-२० मालिकेतही त्याने ५ सामन्यात १२२ धावा केल्या होत्या. मात्र तरीही त्याला आजच्या सामन्यात संधी मिळाली नाही. याचं कारण म्हणजे संघात आता विराट कोहली परतला आहे, त्यासोबतच मिडल ऑर्डरमध्ये के.एल. राहुल आणि श्रेयस अय्यर असल्याने ईशानला संधी मिळाली नाही.ईशान किशन याने शेवटच्या वनडे सामन्यामध्ये ७९ चेंडूत १२५ धावांची खेळी केली होती. यामध्ये किशनने १४ चौकार आणि ७ षटकार मारले होते.



अफगाणिस्तानविरूद्धच्या वन डे मालिकेतील दुसऱ्या सामन्यात त्याने ही वादळी खेळी केली होती. भारतीय संघ व्यवस्थापनासाठी आता डोकेदुखी होणार आहे. कारण आधीच रोहित खेळत असल्याने यशस्वी जयस्वाल याला जागा मिळत नाहीये.दरम्यान, आजच्या सामन्यामध्ये भारताचा स्टार खेळाडू जसप्रित बुमराह ९६८ दिवसांनी कमबॅक करत आहे. बुमराहसोबत दोन प्रमुख वेगवान गोलंदाज म्हणून गुरनूर ब्रार आणि प्रसिद्ध कृष्णा यांना संधी दिली आहे. स्पिनर्समध्ये अक्षर पटेल आणि वॉशिंग्टन सुंदर यांच्याकडे जबाबदारी दिली आहे. दोघेही अष्टपैलू खेळाडू असल्याने बॅटिंगची खोली वाढवण्याचा प्रयत्न असावा. त्यामुळे कुलदीप यादवला प्लेइंग ११ मध्ये संधी मिळाली नाही.


## फिफा वर्ल्ड कप 2026चा पहिला सेमी फायनल सामना

**मुंबई :** फ्रान्सने संभाव्य विजेत्यास साजेशी कामगिरी करीत उपांत्य फेरी गाठली. त्यांची खरी परीक्षा स्पेनविरुद्ध असेल. स्पेनने स्पर्धेत एकच गोल स्वीकारला आहे. फ्रान्सने २०१८मध्ये वर्ल्ड कप जिंकला होता, तर २०२२च्या स्पर्धेत ते उपविजेते होते; मात्र स्पेनने २०२४च्या युरो स्पर्धेच्या उपांत्य फेरीत; तसेच गत वर्षीच्या युरो नेशन्स लीगच्या उपांत्य फेरीत फ्रान्सला नमवले आहे. त्यामुळे फ्रान्सला स्पेनपासून मोठा धोका आहे. आज मध्यरात्री १२.३० वाजता सामन्याला सुरूवात होणार असून डलास स्टेडियम, युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका येथे हा सामना पार पडणार आहे. आतापर्यंत हेड टू हेडमध्ये ३८ सामन्यांत स्पेनचे १८-१३ असे वर्चस्व (गोलफरक ७१ : ४४) राहिले आहे.स्पेनचा संघ म्हणजे केवळ लामिन यमालच नाही हे फ्रान्स संघ जाणतो. स्पेनवरील दडपणही कमी नाही. फ्रान्सने गेल्या सातपैकी चार वर्ल्ड कप स्पर्धात अंतिम फेरी गाठली आहे. या वेळीही फ्रान्सने उपांत्य फेरीत यश मिळवल्यास त्यांची तुलना १९७४ ते १९९० दरम्यानच्या पाचपैकी चार स्पर्धात अंतिम फेरी गाठलेल्या पश्चिम जर्मनीच्या कामगिरीशी होईल.स्पेनच्या बचावफळीची स्पर्धेतील सर्वोत्तममध्ये गणना होत आहे.

## श्रेष्ठ सुरैयाची भरारी, आंतरराष्ट्रीय भौतिकशास्त्र ऑलिम्पियाडमध्ये सुवर्णपदक

■ मुंबई/वृत्तसंस्था

मुंबईतील विद्यार्थी श्रेष्ठ सुरैया याने 56 व्या आंतरराष्ट्रीय भौतिकशास्त्र ऑलिम्पियाड (International Physics Olympiad - IPhO) 2026 मध्ये सुवर्णपदक जिंकून भारताला जागतिक स्तरावर मोठा सन्मान मिळवून दिला आहे. कोलंबियातील बुकारामांगा येथे झालेल्या या स्पर्धेत 87 देशांतील 381 विद्यार्थी सहभागी झाले होते. भारताने उत्कृष्ट कामगिरी करत रशिया, दक्षिण कोरिया, चीन, कझाकस्तान आणि तैवान यांच्यासोबत संयुक्तपणे प्रथम स्थान पटकावलेश्रेष्ठसोबत कनिष्क जैन, ऋद्धेश अनंत बेंडाळे, ऋषित गर्ग आणि स्वरित जोशी या भारतीय विद्यार्थ्यांनाही पदके मिळाली. भारतीय संघाच्या या कामगिरीमुळे देशाच्या विज्ञान शिक्षणाची ताकद पुन्हा एकदा जगासमोर आली आहे. श्रेष्ठचा अभ्यासाकडे पाहण्याचा दृष्टिकोन लहानपणापासूनच वेगळा होता. शालेय अभ्यासक्रमापुरते समाधान न मानता त्याने गणित आणि विज्ञान ऑलिम्पियाडमध्ये सातत्याने सहभाग घेतला. पालकांनीही त्याला विविध शैक्षणिक शिबिरांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन दिले. त्यातून




त्याच्या वैज्ञानिक विचारसरणीला योग्य दिशा मिळाली.त्याची आई मीता सुरैया यांच्या मते, कोरोनाच्या काळात सातवीत असतानाही श्रेष्ठ मोठ्या भावासोबत दहावीच्या ऑनलाइन व्याख्यानांना उपस्थित राहत होता. नवीन विषय समजून घेण्याची त्याची जिज्ञासा आणि शिकण्याची तयारी यामुळे त्याचा आत्मविश्वास वाढत गेला.

होमी भाभा संस्थेतील एका अभ्यास शिबिराने श्रेष्ठच्या आयुष्यात मोठा बदल घडवला. विज्ञान आणि गणिताची आवड असलेल्या विद्यार्थ्यांच्या सहवासातून त्याने आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे प्रतिनिधित्व करण्याचे ध्येय निश्चित केले आणि त्यासाठी कठोर मेहनत सुरू केली.बारावीची बोर्ड परीक्षा, JEE आणि आंतरराष्ट्रीय ऑलिम्पियाडची तयारी अशी तिहेरी जबाबदारी सांभाळत त्याने वेळेचे अचूक नियोजन केले. JEE मध्ये त्याने भारतात 58 वा क्रमांक मिळवला.

## 6 महिन्यांनंतर निराशाजनक कामगिरी; रोहित–विराट नेमके कसे आऊट झाले?



■ मुंबई/वृत्तसंस्था

भारत आणि इंग्लंड यांच्यात एजबेस्टन, बर्मिंगहॅम येथे सुरू असलेल्या पहिल्या वनडे सामन्यात भारतीय संघाला सुरूवातीलाच मोठे धक्के बसले. जवळपास सहा महिन्यांनंतर मैदानात उतरलेल्या रोहित शर्मा आणि विराट कोहली या अनुभवी जोडीकडून मोठ्या खेळीची अपेक्षा होती. मात्र इंग्लंडच्या वेगवान गोलंदाजांनी दोघांनाही स्वस्तात बाद करत भारताची सुरुवातच डळमळीत केली. रोहितने २१ चेंडूत ११ धावा केल्या, तर विराटला अवघ्या ६ चेंडूंचा सामना करता आला आणि तो ५ धावांवर माघारी परतला. दोन्ही अनुभवी फलंदाज लवकर बाद झाल्याने भारतीय डावावर सुरुवातीलाच दबाव निर्माण झाला.रोहित शर्माने आपल्या खेळीत एक आकर्षक चौकार लगावला. मात्र त्यानंतर तो संपूर्ण डावात सहजतेने फलंदाजी करताना दिसला नाही. इंग्लंडच्या गोलंदाजांनी त्याला सतत अचूक टप्प्यावर चेंडू टाकत बांधून ठेवले. २१ चेंडूंत केवळ ११ धावा करताना त्याचा स्ट्राइक रेट ५२.३८ इतकाच होता. सॅम करनच्या गोलंदाजीवर पुढे येत षटकार मारण्याचा प्रयत्न त्याच्यावर उलटला. चेंडू हवेत उंच गेला आणि हॅरी ब्रूकने सुरक्षित झेल घेत रोहितचा डाव संपवला.आयपीएलनंतर दुखापतीतून सावरून संघात पुनरागमन करणाऱ्या विराट कोहलीकडून चाहत्यांना मोठ्या खेळीची अपेक्षा होती. त्याने जोफ्रा आर्चरच्या दुसऱ्याच चेंडूवर चौकार मारत चांगली सुरुवात केली होती. मात्र त्यानंतर आर्चरच्या वेगवान आणि आत येणाऱ्या चेंडूसमोर तो अडचणीत सापडला. आर्चरच्या चेंडूवर विराटच्या पॅडला चेंडू लागल्यानंतर इंग्लंडने जोरदार अपील केले आणि पंचांनी त्याला एलबीडब्ल्यू बाद दिले. विराटने केवळ ६ चेंडूंमध्ये ५ धावा केल्या आणि भारताला दुसरा मोठा धक्का बसला.रोहित शर्मा आणि विराट कोहली या दोघांसाठीही इंग्लंडविरुद्धची वनडे मालिका अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

# हेमा मालिनी यांच्या कारकिर्दीला 60 वर्षं पूर्ण, आता बायोपिकची चर्चा, स्वत:च सांगितलं अभिनेत्रीचं नाव

हिंदी सिनेसृष्टीत आजवर चरित्रपटांना चांगली पसंती मिळाली आहे. त्यातही कलाकारांच्या आयुष्यावर बेतलेले सिनेमे तर नेहमीच चर्चेत राहिले. आगामी काळातही काही लोकप्रिय व्यक्तिमत्त्वांवर चित्रपट येणार आहेत. त्यात कदाचित हेमा मालिनी यांचाही समावेश असू शकतो. याचं कारण असं की, नुकताच त्यांच्या सिनेसृष्टीतील कारकिर्दीला ६० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्तानं कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात त्यांना 'तुमच्यावर चरित्रपट आला, तर तुमची भूमिका साकारण्यासाठी दीपिका पादुकोण योग्य पर्याय वाटतो का?' असं विचारण्यात आलं. त्यावर त्या म्हणाल्या, 'दीपिका सुंदर आणि प्रतिभावान अभिनेत्री आहे. तिची इच्छा असेल, तर ती माझी भूमिका उत्तमरीत्या वठवू शकते.'विशेष म्हणजे, काही वर्षांपूर्वी राम कमल मुखर्जी लिखित 'हेमा मालिनीः बियॉन्ड द ड्रीम गर्ल' या आपल्या चरित्राचं प्रकाशन दीपिकाच्या हस्ते केलं होतं. त्यामुळे दोघींमध्ये एक खास नातं आहे. याशिवाय दीपिकानं 'ओम शांती ओम' साकारलेली भूमिका थेट हेमा मालिनी यांच्यावरच आधारित होती. त्यातील दीपिकानं साकारलेल्या 'शांतीप्रिया' या व्यक्तिरेखेला चित्रपटात 'ड्रीम गर्ल' म्हणून संबोधण्यात आलं होतं. त्यामुळे भविष्यात हेमा मालिनींवर बायोपिक निघाला आणि त्यात दीपिका दिसली, तर आश्चर्य वाटायला नको.१९६३ मध्ये एका तमिळ चित्रपटातून नृत्यांगना म्हणून सुरुवात करणाऱ्या हेमा मालिनी यांनी १९६८ मध्ये 'सपनो का सौदागर' या चित्रपटातून हिंदी सिनेसृष्टीत मुख्य अभिनेत्री म्हणून पदार्पण केलं. या चित्रपटाचे निर्माते बी. अनंत स्वामी यांनी सिनेमाच्या प्रसिद्धीसाठी "Dream Girl Coming to Town" अशी टॅगलाइन वापरली आणि तिथूनच त्यांना 'ड्रीम गर्ल' हे नाव मिळाले जे आजही प्रेक्षकांच्या मनात कायम आहे.जॉनी मेरा नाम', 'सीता और गीता', 'शोले', 'धर्मात्मा' आणि 'सत्ते पे सत्ता' यांसारख्या अनेक ब्लॉकबस्टर चित्रपटांनी त्यांना यशाच्या शिखरावर पोहोचवलं. 'शोले'मधील त्यांची 'बसंती' ही व्यक्तिरेखा आजही प्रेक्षकांच्या मनात जिवंत आहे. तर २००३ मधील 'बागबान' चित्रपटातून त्यांनी पुनरागमन केलं आणि पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या मनावर राज्य केलं. अभिनयासोबतच त्यांनी मथुरा मतदारसंघाच्या खासदार म्हणून राजकारणात आणि समाजसेवेत सक्रिय सहभाग घेतला आहे.



## लिमिट क्रॉस नाही करायची', पापाराझीच्या आक्षेपार्ह कमेंटनंतर संतापली झरीन खान

बॉलिवूडमध्ये गेल्या काही वर्षात पापाराझी ट्रेंड वाढताना दिसतोय. याचा फायदा सेलिब्रिटींनाही होतो, पण अनेकदा त्रासही सहन करावा लागतो. तर कित्येत वेळा हे पापाराझी फोटोग्राफर्स अभिनेत्रींवर नको त्या भाषेत कमेंट्स करताना दिसतात. पापाराझींच्या या कमेंट्स व्हिडिओंमध्ये रेकॉर्डस होता, व्हायरल झाल्यानंतर त्यांच्यावर टीकाही होते. पण आता अभिनेत्री झरीन खान हिच्यासोबत पापाराझीनं असं काही केलं की, त्यामुळं तिनं त्यांना तिथेच कडक शब्दांत सुनावलं आहे. अभिनेत्री झरीन खान सध्या सिनेमांमुळे फार चर्चेत नसली तरी सोशल मीडियावर सक्रिय असते. नुकताच तिचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत असून, यामध्ये ती पापाराझींवर (फोटोग्राफर्स) प्रचंड भडकलेली पाहायला मिळत आहे.तर एका इव्हेंटदरम्यान एका फोटोग्राफरनं केलेल्या असभ्य मागणीमुळं झरीनचा पारा चढला आणि तिने सर्वांसमोरच त्याला खडेबोल सुनावले. ती हातात काही कपडे घेऊन पापाराझींना पोझ देत होती. त्याच वेळी तिथं उपस्थित असलेल्या एका फोटोग्राफरनं तिला चिडवण्याच्या सुरात, "हा ड्रेस इथेच घालून दाखवा," अशी अजब आणि असभ्य मागणी केली.फोटोग्राफरची ही कमेंट ऐकून झरीन कमालीची संतापली. तिनं तात्काळ सडेतोड उत्तर देत विचारलं, "तुमच्या सगळ्यांसमोर? ते अजिबात होणार नाही." "माझ्यासोबत फालतूगिरी करायची नाही..."एवढ्यावरच न थांबता झरीननं अत्यंत आक्रमक भाषेत त्या पापाराझीचा क्लास घेतला. ती म्हणाली की, "माझ्याशी अशी फालतूगिरी करायची नाही. मी अशा गोष्टी खपवून घेणाऱ्यांपैकी नाही, समजलं? सर्वांनी स्वतःच्या मर्यादेत राहा! झरीनच्या या तिखट प्रतिक्रियेनंतर तिथे उपस्थित असलेले इतर फोटोग्राफर्सही काही काळ शांत झाले.

***

## प्रिया मराठेचं अपूर्ण राहिलेलं स्वप्न, पहिल्यांदाच बोलला शंतनू मोघे ; म्हणाला, 'मी नक्की पूर्ण करणार'

सुप्रसिद्ध मराठी अभिनेत्री प्रिया मराठेच्या निधनानं सर्वांनाच धक्का बसला. प्रिया अनेक वर्षांपासून कॅन्सरशी झुंज देत होती आणि तिची ही झुंज अपयशी ठरली. अभिनेत्रीच्या आजारपणात तिचा पती शंतनू मोघेनं खंबीरपणे साथ दिली. अशातच आता नुकत्याच एका मुलाखतीमध्ये शंतनू मोघेनं प्रिया मराठेचं अपूर्ण राहिलेल्या स्वप्नाबद्दल सांगितलं आहे.मुलाखतीदरम्यान प्रिया मराठेच्या अपूर्ण राहिलेल्या इच्छेबद्दल बोलताना शंतनू मोघे म्हणाला की, 'प्रियाचं एक स्वप्न अपूर्ण राहिलं आहे आणि ते म्हणजे प्रोड्युसर होण्याचं. ते मी नक्की पूर्ण करेन.' 'राजश्री मराठी'ला दिलेल्या मुलाखतीमध्ये शंतनू बोलत होता. याच मुलाखतीदरम्यान त्यानं वैयक्तिक आणि अभिनयक्षेत्रातील अनुभवही शेअर केले आहेत. शंतनू म्हणाला की, 'मी, माझे वडील, काका आणि बायको याच क्षेत्रातील असल्यामुळे सगळ्यांना या क्षेत्राबद्दल माहित होती. पुन्हा घरी आल्यावर त्यावर काय बोलणार? म्हणून, आम्ही वेगवेगळ्या विषयांवर गप्पा मारायचो. माझं काम अनेकदा थांबत होतं आणि पुन्हा सुरू व्हायचं. जी काही कामं केली, ती खूप चांगली केली. पण जेव्हा नव्हतं तेव्हा घरी बसलो होतो. खूप काळ असा होता, जेव्हा काहीच काम हातामध्ये नव्हतं. पण माझे आणि प्रियाचे यावरून कधीच वाद झाले नाहीत. या सगळ्यामध्ये प्रियाचा खूप मोठेपणा आहे. ती खूप सुंदर आणि समजूतदार व्यक्ती होती. तिनं सांभाळून घेतलं, नाही तर हे साध्या माणसाचं काम नाहीये. ती माझी बायको होती म्हणून नाही, तर तिनं खरंच खूप साथ दिली.'दरम्यान, प्रिया मराठे आणि शंतनू मोघे यांची एका नाटकादरम्यान ओळख झाली. त्यानंतर त्यांच्यात मैत्री झाली आणि या मैत्रीचं रुपांतर प्रेमात झालं. प्रिया आणि शंतनू यांचं २०१२ मध्ये लग्न झालं. प्रियानं अनेक हिंदी आणि मराठी मालिकांमध्येही काम केलं आहे. दरम्यान, ३१ ऑगस्ट २०२५ रोजी वयाच्या ३८व्या वर्षी प्रियाचं कॅन्सरमुळे निधन झालं.





## अभिनेत्री माधवी निमकरचे व्यवसायक्षेत्रात पदार्पण, कल्याणमध्ये सुरू करणार हॉटेल; नाव अगदी युनिक

सध्याच्या काळात अनेक कलाकार मंडळी सेकंड ऑप्शन म्हणून व्यवसायाकडे वळले आहेत. गेल्या काही दिवसांत अनेक कलाकारांनी क्लोथिंग ब्रँड, हॉटेल, सलोन, पार्लर किंवा आणखी छोटेखानी व्यवसायांमध्ये पाऊल ठेवले. काही दिवसांपूर्वी अभिनेता समीर खांडेकरने पिठीभात नावाचे हॉटेल दादरमध्ये चालू केले. अशातच आता या यादीत आणखी एक लोकप्रिय अभिनेत्री सहभागी झाली आहे. टीव्ही विश्वातील लोकप्रिय खलनायिका अभिनेत्री माधवी निमकर आता हॉटेल विश्वात पदार्पण करत आहे. तिने स्वत: सोशल मीडियावर ही बातमी शेअर केली. माधवीने इन्स्टाग्रामवर पोस्टमध्ये एक व्हिडिओ शेअर केला आहे. ज्यामध्ये मोठी घोषणा... काहीतरी मोठं... लवकरच असं लिहिलंय. तर शेवटी कल्याणमस्तू...स्वाद आणि आशिर्वाद असं हॉटेलचं नाव जाहिर केलंय. माधवीचं हे हॉटेल कल्याणमध्ये असेल. याबाबतची अधिकची माहिती ती लवकरच आपल्या चाहत्यांना देणार आहे. माधवी निमकरने ही पोस्ट शेअर केल्यावर लगेचच तिची सुख म्हणजे नक्की काय असतं या मालिकेतील सहकलाकार गौरी म्हणजे गिरीजा प्रभूने कॉन्ग्रॅज्युलेशन ताई म्हणत तिने अभिनंदन केले. याशिवाय लक्ष्मी निवास फेम अभिनेत्री मिनाक्षी राठोडनेही तिचे अभिनंदन केले. याशिवाय माधवी निमकरच्या बऱ्याच चाहत्यांनी सुद्धा तिचे अभिनंदन केले आहे.माधवी निमकरच्या कामाबद्दल बोलायचे झाल्यास स्टार प्रवाहवरील सुख म्हणजे नक्की काय असतं या मालिकेतील शालिनी या पात्रामुळे ती घराघरात प्रसिद्ध झाली. तिने या मालिकेत खल पात्र साकारले होते पण तरीही प्रेक्षकांनी तिच्यावर भरभरुन प्रेम केले. माधवीने याशिवाय पुढचं पाऊल, जावई विकत घेणे आहे, चार दिवस सासूचे, स्वप्नांच्या पलिकडले, कुंकू यांसारख्या मालिकांमध्येही तिने महत्वाच्या भूमिका साकारल्या आहेत. सध्या माधवी तुझ्या सोबतीने या स्टार प्रवाहवरील मालिकेत पुन्हा एकदा खलभूमिका साकारत आहे. माधवीने काही सिनेमांमध्येही उल्लेखनीय कामगिरी बजावली. त्यात पावनखिंड, संघर्ष, नवरा माझा भवरा यांसारख्या सिनेमांचा समावेश आहे.अभिनयसोबतच व्यवसाय क्षेत्रात पदार्पण करणाऱ्या कलाकारांबद्दल सांगायचे झाल्यास त्यात ऋजुता बागवे, मृणाल दुसानिस, अनघा अतुल, अरबाज शेख, समीर खांडेकर, समीर परांजपे यांसारख्या अनेक कलाकारांचा समावेश आहे.

# अमृत भारत स्टेशन योजनेतून नांदुरा रेल्वे स्थानकाचा कायापालट

## १०.६३ कोटींच्या पुनर्विकासानंतर लवकरच राष्ट्राला समर्पित

जनसंचलन/बुलढाणा

भारतीय रेल्वेच्या अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागातील नांदुरा रेल्वे स्थानकाचा १०.६३ कोटी रुपये खर्चून आधुनिक सुविधांसह सर्वांगीण पुनर्विकास करण्यात आला असून, हे स्थानक लवकरच राष्ट्राला समर्पित करण्यात येणार आहे. हावडानागपूरमुंबई या महत्वाच्या रेल्वे मार्गावरील नांदुरा हे बुलढाणा जिल्ह्याचे प्रमुख रेल्वे प्रवेशद्वार असून, दररोज सुमारे ४,५४५ प्रवासी आणि ३६ गाड्यांची ये-जा या स्थानकावरून होते. प्रवासी वाहतुकीबरोबरच कृषी आणि औद्योगिक क्षेत्रासाठीही हे स्थानक महत्वपूर्ण भूमिका बजावत आहे. अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत स्थानकाचे आधुनिक स्थानक इमारत, प्रशस्त आरक्षण कार्यालय, चार आरक्षण कक्ष, वातानुकूलित प्रतीक्षा कक्ष, पुरुष, महिला व दिव्यांगांसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे, नवीन प्रवेशद्वार, वाहनतळ, संरक्षक भिंत, आधुनिक प्रकाशयोजना, व्हिट्रिफाइड फरशी, पिण्याच्या पाण्याची सुविधा, टिकाऊ फर्निचर तसेच दृष्टीहीनांसाठी मार्गदर्शक पट्टे अशा विविध सुविधांनी सुसज्ज करण्यात आले आहे. याशिवाय फलाट क्रमांक १ वर १६० मीटर आणि फलाट क्रमांक २ वर २२४ मीटर लांबीचे नवीन छप्पर उभारण्यात आले आहे. दिव्यांगांसाठी अडथळामुक्त प्रवेश, कमी उंचीचे आरक्षण कक्ष, विशेष प्रसाधनगृहे, राखीव पार्किंग आणि आधुनिक दिशादर्शक फलक यामुळे स्थानक अधिक सुलभ व प्रवासी-केंद्रित बनले आहे. नांदुरा हे बुलढाणा जिल्ह्यातील प्रमुख कृषी बाजारपेठ असून येथून गहू, सोयाबीन, कांदा आणि कापूस यांची मोठ्या प्रमाणावर वाहतूक केली जाते. तसेच तेल गिरण्या, डाळ प्रक्रिया उद्योग आणि प्रसिद्ध नांदुरा खव्याच्या वाहतुकीसाठीही हे स्थानक महत्त्वाचे आहे. पर्यटनाच्या दृष्टीनेही नांदुरा परिसराला विशेष महत्त्व आहे. १०५ फूट उंच हनुमान मूर्ती, अंबादेवीगड, ज्ञानगंगा नदी परिसर, तसेच शेगाव, ज्ञानगंगा अभयारण्य आणि लोणार विवर यांसारखी पर्यटनस्थळे या स्थानकामुळे अधिक सुलभ होणार आहेत. या पुनर्विकासामुळे प्रवाशांच्या सोयी-सुविधांमध्ये वाढ, स्वच्छता व सुरक्षिततेत सुधारणा, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांगांसाठी अधिक सुलभता, वाहनतळाची सुविधा आणि स्थानिक व्यापार व पर्यटनाला चालना मिळणार असल्याचे रेल्वे प्रशासनाने सांगितले आहे. महाराष्ट्रातील अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत निवडलेल्या १५ स्थानकांपैकी सावदा, धुळे, देवळाली, मूर्तिजापूर आणि लासलगाव ही स्थानके यापूर्वी राष्ट्राला समर्पित करण्यात आली असून, आता नांदुरा स्थानकाचाही त्यात समावेश होत आहे.




# विठुरायाच्या दर्शनासाठी जिल्ह्यातून २४५ विशेष बसेस...



जनसंचलन-बुलढाणा

यावर्षी आषाढी एकादशी २५ जुलै रोजी साजरी होत असून लाखो वारकरी विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूर हे प्रस्थान करणार आहेत. या काळात राज्यभरातून भाविकांची मोठी गर्दी होते परिवहन महामंडळाने विशेष वाहतूक व्यवस्था केली आहे. बुलढाणा विभागातून आषाढी यात्रेसाठी बुलढाणा जिल्ह्यातून २४५ यात्रा स्पेशल बसेसची व्यवस्था केली आहे. प्रवासादरम्यान ज्येष्ठ नागरिक आणि महिलांसाठी लागू असलेल्या भाडे सवलत ही कायम राहणार आहे. तसेच गावातून संस्था भजनी मंडळ किंवा वारकरी दिंडीतील ४० प्रवासी एकत्र आल्यास त्यांच्या सोयीसाठी तातडीने विशेष बस उपलब्ध करून देखील दिल्या जाणार आहे.

# गिरडा गावात बिबट्याचा पुन्हा धुमाकूळ एका रात्रीत ७ शेळ्या ठार

जनसंचलन-बुलढाणा



जंगलालगत असलेल्या गिरडा गावात बिबट्याचा मुक्त संचार सुरू असून वन्य प्राणी आता थेट गावात शिरत आहेत. मागील आठवड्यात ६ शेळ्यांचा फडशा पाडल्यानंतर काल रात्री बिबट्याने पुन्हा गोठ्यात घुसून ७ शेळ्या ठार केल्या. या हल्ल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण आहे. गावाभोवती संरक्षणात्मक तार कंपाउंड उभारण्याची मागणी अनेकदा वन विभागाकडे करण्यात आली असून आमदार संजय गायकवाड यांनीही पावसाळी अधिवेशनात हा मुद्दा उपस्थित केला होता. मात्र अद्याप ठोस उपाययोजना न झाल्याने ग्रामस्थांनी तातडीने गिरडा गावाभोवती कंपाउंड उभारण्याची मागणी वन विभागाकडे केली आहे...

# मातंग समाजातील विद्यार्थ्यांसाठी अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती; २७ जुलैपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

जनसंचलन/बुलढाणा

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या), जिल्हा कार्यालय बुलढाणा यांच्या वतीने मातंग समाज व तत्सम बारा पोटजातीतील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी प्रोत्साहनपर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात दहावी, बारावी, पदवी, पदव्युत्तर तसेच वैद्यकीय व अभियांत्रिकी अभ्यासक्रमांमध्ये सरासरी ६० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांनी या योजनेसाठी अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. या योजनेअंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना गुणक्रमांक व उपलब्ध निधीनुसार प्रोत्साहनपर शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येणार आहे. आर्थिकदृष्ट्या गरजू व गुणवंत विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे, हा या योजनेचा उद्देश आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, रेशन कार्ड, गुणपत्रिका, बोनाफाईड प्रमाणपत्र, दोन पासपोर्ट आकाराचे फोटो, आधार कार्ड व बँक पासबुकची प्रत आदी आवश्यक कागदपत्रांसह दि. २७ जुलै २०२६ पर्यंत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या), डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, चिखली रोड, बुलढाणा येथे कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष येऊन प्रस्ताव सादर करावेत. अधिकाधिक पात्र विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेऊन शिष्यवृत्तीसाठी वेळेत अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक दि. शं. पाखमोडे यांनी केले आहे.






# अवघ्या २,५०० रुपयांत वीज बिलातून सुटका...

## स्मार्ट सोलर योजनेचा लाभ घेण्याचे महावितरणचे आवाहन



**जनसंचलन-बुलडाणा**

दारिद्र्यरेषेखालील (बीपीएल) ,तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील घरगुती वीज ग्राहक ज्यांचा वीज वापर महिन्याला १०० युनिटपेक्षा कमी आहे. अश्या ग्राहकांना कायमस्वरूपी वीजबिलातून दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप सोलार (स्मार्ट) योजना सुरू केली आहे. या योजनेत केंद्र आणि राज्य शासनाच्या एकत्रित अनुदानामुळे बीपीएल ग्राहकांना अवघ्या २,५०० रुपयांत १ किलोवॅट क्षमतेचा सौर प्रकल्प उभारता येणार आहे. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर योजना राबविण्यात येत असून, पात्र नागरिकांनी त्वरित अर्ज करावेत, असे आवाहन मुख्य अभियंता दत्तात्रय बनसोडे यांनी केले आहे.

अकोला परिमंडळातील ४ लाख ७२ हजार ६४९ ग्राहक या योजनेसाठी पात्र आहेत. यात अकोला जिल्ह्यात १ लाख ३५ हजार ६७६, बुलडाणा जिल्ह्यात २ लाख ३६ हजार ४१९ आणि वाशिम जिल्ह्यात १ लाख ५५४ ग्राहकांचा समावेश आहे. प्रारंभी वर्ष २०२६ - २७ ला परिमंडळातील २० हजार २४६ लाभार्थ्यांना योजनेत सहभागी करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

१ किलोवॅट सौर प्रकल्पासाठी अंदाजे ५० हजार रुपये खर्च येतो. केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना अंतर्गत ३० हजार रुपयांचे अनुदान मिळते. त्यावर राज्य शासनाकडून बीपीएल लाभार्थ्यांना १७,५०० रुपये अतिरिक्त अनुदान दिले जाणार आहे.त्यामुळे या ग्राहकांना केवळ २५०० रूपयेच आपला हिस्सा भरायचा आहे. त्याच प्रमाणे अनुसूचित जाती-जमातींसाठी राज्यशासनाचे अतिरिक्त अनुदान १५ हजार रूपये असल्याने या वर्गवारीतील लाभार्थ्यांना ५ हजार रूपये भरून योजनेचा लाभ घेता येतो, तर इतर आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील लाभार्थ्यांना १० हजार रूपये भरून योजनेचा लाभ घेता येणार आहे.

परिमंडळात १५ हजार ४९१ नागरीकांनी या योजनेत लाभ घेण्यासाठी अर्ज केला असून त्यांचे तांत्रिक बाबिंचा सर्वे करून मान्यता देण्यात आली आहे. परंतू केवळ ३४ जणांनीच सहभागी होण्यासाठी आवश्यक रकमेचा भरणा केला आहे.

योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदार घरगुती वीज ग्राहक असणे, वैध वीजजोडणी, छतावर सौर पॅनेल बसविण्यासाठी जागा, मागील १२ महिन्यांचा सरासरी वीजवापर १०० युनिटपेक्षा कमी असणे आणि यापूर्वी कोणत्याही सौर अनुदानाचा लाभ न घेतलेला असणे आवश्यक आहे.

लाभार्थ्यांना भारतीय बनावटीच्या आयईसी () प्रमाणित सौर पॅनेलसह पाच वर्षांची मोफत देखभाल दिली जाणार आहे. या प्रणालीमुळे वीजबिल जवळपास शून्यावर येण्याबरोबरच अतिरिक्त वीज महावितरणला विकून उत्पन्न मिळविण्याची संधीही ग्राहकांना उपलब्ध होणार आहे. पात्र ग्राहकांनी राष्ट्रीय सौर पोर्टलवर नोंदणी करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणने केले आहे.

# टीबी रुग्णाला सहा महिन्यांसाठी पोषण आहार किट चे वाटप...



**जनसंचलन-बुलढाणा**

प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियानांतर्गत क्षयरोग निर्मूलनासाठी समाजाच्या सहभागाला चालना देण्याच्या उद्देशाने जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रणजीत मंडाले यांनी एका टीबी रुग्णाला पुढील सहा महिन्यांसाठी पोषण आहार किट देण्याचा संकल्प करून रुग्ण दत्तक घेतला आहे. या उपक्रमामुळे रुग्णाला उपचारांसोबत आवश्यक पोषण मिळण्यास मदत होणार आहे. राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत क्षयरुग्णांना नियमित औषधोपचाराबरोबरच सकस व संतुलित आहाराची गरज असते. या गरजेची पूर्तता करण्यासाठी निक्षय मित्र संकल्पनेद्वारे समाजातील विविध घटक, अधिकारी, कर्मचारी, स्वयंसेवी संस्था आणि उद्योजक यांना क्षयरुग्ण दत्तक घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. याच अनुषंगाने जिल्हा क्षयरोग कार्यालय, बुलढाणा येथे आयोजित कार्यक्रमात डॉ. रणजीत मंडाले यांनी रुग्णास पोषण आहार किट प्रदान केले. या किटमध्ये डाळी, कडधान्ये, खाद्यतेल, प्रथिनयुक्त खाद्यपदार्थ तसेच इतर पौष्टिक साहित्याचा समावेश आहे. या पोषण सहाय्यामुळे रुग्णाची रोगप्रतिकारक शक्ती वाढून उपचारांना अधिक चांगला प्रतिसाद मिळण्यास मदत होणार आहे. यावेळी जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. वर्षा गुट्टे, वैद्यकीय अधिकारी डॉ. दिनकर खिरोडकर तसेच जिल्हा क्षयरोग कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. डॉ. मंडाले यांनी यावेळी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, ङ्कटीबी हा पूर्णपणे बरा होणारा आजार असून वेळेवर निदान, नियमित उपचार आणि पोषक आहार यांच्या मदतीने रुग्ण पूर्णपणे निरोगी होऊ शकतो. समाजातील सक्षम व्यक्ती, संस्था व उद्योजकांनी निक्षय मित्र म्हणून पुढे येऊन क्षयरुग्णांना आधार द्यावाबुलढाणा जिल्हा क्षयरोगमुक्त करण्यासाठी प्रशासन, आरोग्य विभाग आणि समाज यांच्या संयुक्त प्रयत्नातून निश्चितच यश मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# मरणोत्तर नेत्रदानातून मानवतेचा संदेश; दिवंगत सुशीला इंगळे यांना विनम्र अभिवादन

**जनसंचलन-मेहकर**

पिंप्री माळी (ता. मेहकर) येथील रहिवासी दिवंगत सौ. सुशीला श्रीराम इंगळे यांचे मरणोत्तर नेत्रदान करण्यात आले. दुःखाच्या प्रसंगातही समाजहिताचा विचार करत त्यांच्या कुटुंबीयांनी नेत्रदानाचा निर्णय घेत मानवतेचा आदर्श समाजासमोर ठेवला. जिल्हा रुग्णालय, बुलढाणा येथील नेत्रदान चमूने आवश्यक वैद्यकीय प्रक्रिया पूर्ण करून नेत्र संकलन केले. या नेत्रदानामुळे दृष्टीहीन व्यक्तींना दृष्टी प्राप्त होण्यास मदत होणार असून, त्यांच्या जीवनात नव्या आशा आणि प्रकाशाचा किरण निर्माण होणार आहे. नेत्रदान हे मृत्यूनंतरही इतरांच्या जीवनात प्रकाश निर्माण करणारे सर्वो च्च दान मानले जाते. दिवंगत सौ. सुशीला इंगळे यांच्या कुटुंबीयांनी



घेतलेल्या या प्रेरणादायी निर्णयाबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे कौतुक करण्यात येत आहे. या घटनेमुळे समाजामध्ये नेत्रदानाबाबत सकारात्मक जनजागृती निर्माण होण्यास मदत होणार आहे. जिल्हा प्रशासन व आरोग्य विभागाच्या वतीने दिवंगत सौ. सुशीला श्रीराम इंगळे यांना विनम्र अभिवादन करण्यात आले असून, नागरिकांनी नेत्रदानाचा संकल्प करून या महादान चळवळीत सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# अमृत भारत स्टेशन योजनेतून नांदुरा रेल्वे स्थानकाचा कायापालट; १०.६३ कोटींच्या पुनर्विकासानंतर लवकरच राष्ट्राला समर्पित

**जनसंचलन-बुलढाणा**

भारतीय रेल्वेच्या अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागातील नांदुरा रेल्वे स्थानकाचा १०.६३ कोटी रुपये खर्चून आधुनिक सुविधांसह सर्वांगीण पुनर्विकास करण्यात आला असून, हे स्थानक लवकरच राष्ट्राला समर्पित करण्यात येणार आहे. हावडानागपूरमुंबई या महत्त्वाच्या रेल्वे मार्गावरील नांदुरा हे बुलढाणा जिल्ह्याचे प्रमुख रेल्वे प्रवेशद्वार असून, दररोज सुमारे ४,५४५ प्रवासी आणि ३६ गाड्यांची ये-जा या स्थानकावरून होते. प्रवासी वाहतुकीबरोबरच कृषी आणि औद्योगिक क्षेत्रासाठीही हे स्थानक महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत स्थानकाचे आधुनिक स्थानक इमारत, प्रशस्त आरक्षण कार्यालय, चार आरक्षण कक्ष, वातानुकूलित प्रतीक्षा कक्ष, पुरुष, महिला व दिव्यांगांसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे, नवीन प्रवेशद्वार, वाहनतळ, संरक्षक भिंत, आधुनिक प्रकाशयोजना, व्हिट्रिफाइड फरशी, पिण्याच्या पाण्याची सुविधा, टिकाऊ फर्निचर तसेच दृष्टीहीनांसाठी मार्गदर्शक पट्टे अशा विविध सुविधांनी सुसज्ज करण्यात आले आहे. याशिवाय फलाट क्रमांक १ वर १६० मीटर आणि फलाट क्रमांक २ वर २२४ मीटर लांबीचे नवीन छप्पर उभारण्यात आले आहे. दिव्यांगांसाठी अडथळामुक्त प्रवेश, कमी उंचीचे आरक्षण कक्ष, विशेष प्रसाधनगृहे, राखीव पार्किंग आणि आधुनिक दिशादर्शक फलक यामुळे स्थानक अधिक सुलभ व प्रवासी-केंद्रित बनले आहे. नांदुरा हे बुलढाणा जिल्ह्यातील प्रमुख कृषी बाजारपेठ असून येथून गहू, सोयाबीन, कांदा आणि कापूस यांची मोठ्या प्रमाणावर वाहतूक केली जाते. तसेच तेल गिरण्या, डाळ प्रक्रिया उद्योग आणि प्रसिद्ध नांदुरा खव्याच्या वाहतुकीसाठीही हे स्थानक महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रातील अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत निवडलेल्या १५ स्थानकांपैकी सावदा, धुळे, देवळाली, मूर्तिजापूर आणि लासलगाव ही स्थानके यापूर्वी राष्ट्राला समर्पित करण्यात आली असून, आता नांदुरा स्थानकाचाही त्यात समावेश होत आहे.पर्यटनाच्या दृष्टीनेही नांदुरा परिसराला विशेष महत्त्व आहे. १०५ फूट उंच हनुमान मूर्ती, अंबादेवीगड, ज्ञानगंगा नदी परिसर, तसेच शेगाव, ज्ञानगंगा अभयारण्य आणि लोणार विवर यांसारखी पर्यटनस्थळे या स्थानकामुळे अधिक सुलभ होणार आहेत.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे
दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८